Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik – 422 222
(NAAC Accredited 'A' Grade)

# SUBJECT: Photographs of the some of events

**Foundation Day: 1st July 2023**













यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik

NAAC Accredited 'A' Grade

Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : www.ycmou.ac.in • https://ycmou.digitaluniversity.ac

ई-मेल E-mail : services_dept@ycmou.ac.in दूरध्वनी Telephone : (0253) 2230111

सेवा सुविधा कक्ष / Services Section

जा.क्र.यचममुवि/सेवा/२०२३/६०१ दिनांक : २९/०६/२०२३

**परिपत्रक**

विद्यापीठातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी कर्मचारी यांना कळविण्यात येते की, शनिवार दिनांक ०१ जुलै २०२३ रोजी विद्यापीठाचा ३४ वा स्थापना दिवस असल्यामुळे विद्यापीठात खालील प्रमाणे विविध कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे.

सदरचा कार्यक्रम मा. कुलगुरु यांच्या उपस्थितीत विद्यापीठाच्या मुख्य इमारतीजवळ सकाळी १०.३० वाजता आयोजित करण्यात येत आहे.

| क्र | कार्यक्रम | ठिकाण | वेळ |
|---|---|---|---|
| १ | वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करणे | प्रशासकीय इमारत | सकाळी १०.३० ते १०.३५ |
| २ | यशवंतराव चव्हाण यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन | प्रशासकीय इमारती समोर | सकाळी १०.४० ते १०.५० |
| ३ | यशवंतराव चव्हाण यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करणे | यशवंतराव चव्हाण स्मृती संग्रहालय इमारतीजवळ | सकाळी १०.५५ ते ११.०० |
| ४ | विद्यापीठ ध्वजारोहन/ मा. कुलगुरुंचे मनोगत | प्रशासकीय इमारती समोर | सकाळी ११.१० ते ११.२० |
| ५ | राष्ट्रगीत | प्रशासकीय इमारत | सकाळी ११.२१ ते ११.२२ |
| ६ | चहापानाचा कार्यक्रम | प्रशासकीय इमारत | सकाळी ११.२२ ते ११.३० |

कुलसचिव (प्र)

प्रत माहितीसाठी — मा. कुलगुरु यांचे कार्यालय

प्रति, १) सर्व विद्याशाखा व विभागांचे संचालक, केंद्र, कक्ष प्रमुख, सर्व विभागीय केंद्रे यांनी सदरचे परिपत्रक सर्व शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी, कर्मचारी, करारावरील अधिकारी, कर्मचारी, यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

२) प्रमुख जनसंपर्क कक्ष - सदरहू कार्यक्रमाचे संचलन करावे.

३) श्री. तुकाराम पाटील, सहायक सदर कार्यक्रमासाठी हार व फुलांची व्यवस्था करण्यासाठी.

**Indradhanushya: 13th October 2023**



Y.C.M.O.U PRO Date 13 Oct 2023 Sakal pg 5

सकाळ

नाशिक, शुक्रवार, १३ ऑक्टोबर २०२३

# मुक्त विद्यापीठात आज केंद्रीय युवक महोत्सव

नाशिक, ता. १२ : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे शुक्रवारी (ता. १३) केंद्रीय युवक महोत्सव होत आहे. युवा कलावंतांच्या कलागुणांचा आविष्कार असलेल्या या महोत्सवाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली होईल, अशी माहिती कुलसचिव डॉ. भट्टप्रसाद पाटील यांनी दिली.

विद्यार्थी कल्याण केंद्राचे प्रमुख डॉ. दयाराम पवार यांच्या मार्गदर्शनाखाली युवक महोत्सव होत आहे. या महोत्सवातून निवडलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आयोजित 'इंद्रधनुष्य २०२३'मध्ये सहभागी होण्याची संधी मिळेल. पुढील महिन्यात हा महोत्सव नियोजित आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या गोवर्धन येथील मुख्यालयात होणाऱ्या केंद्रीय युवक महोत्सवात विद्यापीठाच्या नाशिक, मुंबई, नागपूर, पुणे, अमरावती, नांदेड, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर या आठ विभागीय केंद्रांतून विद्यार्थी सहभागी होत आहेत. एकांकिका, मुकाभिनय, मिमिक्री, प्रहसन, शास्त्रीय गायन, समूह गायन, सुगम संगीत, वाद्यवादन, समूह नृत्य, शास्त्रीय नृत्य, वक्तृत्व, वादविवाद, चित्र, पोस्टरमेकिंग, रांगोळी, स्पॉट फोटोग्राफी, क्ले मॉडेलिंग, प्रश्नमंजूषा, शिल्पकला आदी स्पर्धांचे आयोजन केले आहे. दिवसभर विद्यापीठाच्या आवारात रंगणाऱ्या या युवा महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी विद्यापीठातील विविध समित्या परिश्रम घेत आहेत.

**Kridamahotsav**: **Tournament 2023-24**













Y.C.M.O.U (PRO) Date 18 Dec 2023 Maharashtra Times

महाराष्ट्र टाइम्स | महाराष्ट्र टाइम्स । नाशिक । सोमवार, १८ डिसेंबर २०२३

## नाशिक केंद्राला मिळाले विजेतपद

### 'मुक्त'च्या क्रीडा महोत्सवाचा समारोप



म. टा. प्रतिनिधी, नाशिक

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामार्फत आयोजित दोन दिवसीय क्रीडा महोत्सवाचे सर्वसाधारण विजेतपद विद्यापीठाच्या नाशिक केंद्राला मिळाले. पोलिस आयुक्त संदीप कर्णिक या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या स्पर्धेचे बक्षीस वितरण विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांच्या हस्ते झाले.

यावेळी बोलताना कुलगुरू डॉ. सोनवणे म्हणाले की, खेळाडूंसाठी जे काही चांगले करायचे असेल त्यासाठी विद्यापीठ मागेपुढे पाहणार नाही. विद्यापीठ खेळाडूंना प्रोत्साहीत करण्यासाठी सतत तयार असेल. या स्पर्धेतून निवड झालेला विद्यापीठाचा संघ नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात १२ ते १६ जानेवारीदरम्यान होणाऱ्या, तसेच लोणारे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजिकल विद्यापीठात २० ते २४ जानेवारीदरम्यान होणाऱ्या राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेत सहभागी होणार आहे. लांबउडी, भालाफेक, गोळाफेक, धावणे, उंच उडी, थाळी फेक, तिहेरी उडी, कबड्डी, खो-खो, बॅडमिंटन आदी स्पर्धा घेण्यात आल्या.

YCMOU PRO Section (17 Dec. 2023)

रविवार today | सकाळ

मुक्त विद्यापीठाच्या केंद्रीय क्रीडा महोत्सवाचा समारोप

## मुंबई, नाशिकच्या खेळाडूंची चमकदार कामगिरी



Y.C.M.O.U (PRO) Date 15 Dec 2023 Lokmat

pg 2

लोकमत | नाशिक, शुक्रवार, दि. १५ डिसेंबर २०२३ | २

## मुक्त विद्यापीठात केंद्रीय क्रीडामहोत्सवास प्रारंभ

नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात दोनदिवसीय क्रीडा स्पर्धांना प्रारंभ झाला. या स्पर्धेचे उद्घाटन शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त सुनील जाधव यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, त्याचप्रमाणे व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, कुलसचिव भटूप्रसाद पाटील, वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, मधुकर राळेभात, सुनील साळुंके, दिलीप भंडारे आणि प्रमुख पंच त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या विविध विद्याशाखांचे संचालक उपस्थित होते.

प्रारंभी ध्वजारोहण केल्यानंतर आठही विभागीय केंद्रांच्या खेळाडूंनी विद्यापीठ ध्वजासहीत संचलन केले. त्यानंतर विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी आणलेल्या क्रीडाज्योतीद्वारे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते क्रीडाज्योत पेटवून व फुगे आकाशात सोडून या क्रीडा महोत्सवाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी विद्यापीठाच्या खेळाडूंना 'खिलाडूवृत्ती आणि बंधुत्वाची' शपथ देण्यात आली. याप्रसंगी कुलगुरू यांनी विद्यापीठाच्या मैदानावर खेळाडूंसाठी विद्यापीठाचे एक क्रीडासंकुल उभारण्याचा मनोदय व्यक्त केला. विद्यापीठासाठी जास्तीत जास्त पदक आणल्यास त्या खेळाडूंचा यथोचित गौरव करण्यात येईल, असेही त्यांनी नमूद केले. विद्यार्थी कल्याण केंद्राचे प्रमुख डॉ. दयाराम पवार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रमोद पवार यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय केला, तर क्रीडा समन्वयक सुनील साळुंके यांनी आभार प्रदर्शन केले. डॉ. बाजीराव पेखळे यांनी सूत्रसंचालन केले.



मुक्त विद्यापीठात सुरु झालेल्या क्रीडा महोत्सवात कबड्डी स्पर्धेतील एक क्षण.

### ४५० खेळाडूंचा सहभाग

या स्पर्धेत मुक्त विद्यापीठाच्या अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे, कोल्हापूर आणि नांदेड अशा आठ विभागीय केंद्रावरील सुमारे ४५० खेळाडू सहभागी झाले आहेत. केंद्रीय क्रीडा स्पर्धेत ॲथलेटिक्स, कबड्डी, खो-खो, फुटबॉल, बास्केटबॉल, व्हॉलिबॉल, टेबल-टेनिस, बुद्धिबळ आणि बॅडमिंटन या खेळांचा समावेश आहे.

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**

गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक-४२२२२२

Ph. (0253-2230580, 2230715 http://ycmou.ac.in , http://ycmou.digitaluniversity.ac

e-mail : [illegible]

जा.क्र.यचममुवि/कुल/क्रि-टी२०/२०२३/ | दिनांक :३०/१०/२०२३

### परिपत्रक

दिनांक २६ डिसेंबर २०२३ पासून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर येथे होणाऱ्या "अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कुलगुरु चषक टी-२० क्रिकेट २०२३" स्पर्धेसाठी मा. कुलगुरू यांचे परवानगीनुसार आपल्या विद्यापीठाचा संघ सहभागी होणार आहे. विद्यापीठातील सर्व नियमित शिक्षक/अधिकारी/कर्मचारी यांना कळविण्यात येते की, ज्या इच्छूक खेळाडूंना या स्पर्धेत सहभाग घ्यायचा असेल, त्यांनी आपली नांवे श्री रामदास गुंबाडे, नोंदणी कक्ष यांचेकडे दि. ०३.११.२०२३ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत नोंदवावीत.

नाव नोंदणी केलेल्या खेळाडूंमधून निवड समितीमार्फत अंतिम १४ खेळाडूंची स्पर्धेसाठी निवड करण्यात येईल.

कुलसचिव

प्रत-

१) मा.कुलगुरू कार्यालय
२) मा.कुलसचिव कार्यालय
३) सर्व विभाग/केंद्र/कक्ष/प्रमुख/विभागीय संचालक यांनी सदरचे परिपत्रक आपल्या अधिनस्त असलेल्या नियमित शिक्षक/अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

**KVK Activities:**











**NSS Activities:**






## Festivals: Ganpati, Diwali Festivals 2023-24



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
अंतर्गत संज्ञापन पत्र / Internal Communication Sheet

दि. २०/०९/२०२३

**माहितीपत्रक**


आपल्या विद्यापीठात दरवर्षीप्रमाणे काल दि. १९ सप्टेंबर २०२३ पासून गणेशोत्सवास सुरुवात झाली असून दि. २५ सप्टेंबर २०२३ पर्यंत आयोजित केलेला आहे. रोज सकाळी १० वाजून १० मिनिटे आणि सायंकाळी ०५.०० वाजता अशा दोन वेळेस आरती आपल्या विद्यापीठातील खालील मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. तरी कृपया याची सर्वांनी नोंद घ्यावी.

| अ. क्र. | वार व दिनांक | सकाळ | संध्याकाळ |
|---|---|---|---|
| ०१ | बुधवार, २०/०९/२०२३ | डॉ. गोविंद कत्तलाकुटे<br>मा.वित्त अधिकारी | डॉ. मधुकर शेवाळे<br>संचालक |
| ०२ | गुरुवार, २१/०९/२०२३ | श्री. बी. पी. पाटील<br>मा.कुलसचिव | श्री. राजेंद्र लडेले<br>नेटवर्क इंजिनियर |
| ०३ | शुक्रवार, २२/०९/२०२३ | डॉ.जयदीप निकम<br>व्यवस्थापन मंडळ सदस्य | श्री.निखील [illegible]<br>उपकुलसचिव, परीक्षा-२ |
| ०४ | शनिवार, २३/०९/२०२३ | डॉ.प्रकाश देशमुख<br>संचालक, विद्यार्थी सेवा विभाग | डॉ.नितीन ठोके<br>प्रमुख,कृषी विज्ञान केंद्र |
| ०५ | सोमवार, २५/०९/२०२३ | डॉ.सुरेंद्र पाटोळे<br>अध्यक्ष, गणेशोत्सव मंडळ २०२३ | श्री. रत्नाकर कोठावदे<br>लघुलेखक |
| ०६ | सोमवार, २५/०९/२०२३ | सौ. माधुरी [illegible]<br>उपाध्यक्ष, अध्यक्ष, गणेशोत्सव मंडळ २०२३ (विसर्जन आरती) | |

वरील सर्व मान्यवरांनी नियोजित वेळेच्या ५ मिनिटे अगोदर उपस्थित राहावे हि नम्र विनंती.

डॉ.सुरेंद्र पाटोळे
अध्यक्ष
गणेश उत्सव २०२३ समिती

सौ. माधुरी [illegible]
उपाध्यक्ष
गणेश उत्सव २०२३ समिती



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
अंतर्गत संज्ञापन पत्र / Internal Communication Sheet

दि. २०/०९/२०२३

**माहितीपत्रक**

[illegible]

| अ.क्र. | कार्यक्रमाचे स्वरूप | दिनांक | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| ०१ | महाप्रसाद | शनिवार, २३/०९/२०२३ | दुपारी १ ते २ | दृकश्राव्य इमारत (AVC Building) |
| ०२ | 'एक होता राजहंस' नाट्यप्रयोग | शनिवार, २३/०९/२०२३ | दुपारी ०३.३० ते ०५.०० | |
| ०३ | सत्यनारायण पूजा | सोमवार, २५/०९/२०२३ | सकाळी १०.३० ते ११.३० | मुख्य इमारत |
| ०४ | गणपती मूर्ती विसर्जन | सोमवार, २५/०९/२०२३ | दुपारी ०३.०० वाजता | मुख्य इमारत ते कृषी विज्ञान केंद्र येथील पाझर तलाव |

वरील आयोजित कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन गणेश मंडळाच्या वतीने करण्यात येत आहे.

डॉ.सुरेंद्र पाटोळे
अध्यक्ष
गणेश उत्सव २०२३ समिती

सौ. माधुरी [illegible]
उपाध्यक्ष
गणेश उत्सव २०२३ समिती

प्रत माहितीस्तव :
१) मा.कुलगुरू कार्यालय २) मा.कुलसचिव कार्यालय

[illegible]













**Sanvidhan Din Activities:**



Y.C.M.O.U PRO Date 30 Oct 2023 Sakal pg 2

सकाळ | नाशिक, सोमवार, ३० ऑक्टोबर २०२३

## 'मुक्त'मध्ये संविधान साक्षरता कार्यशाळा

### सुजाण नागरिक घडविण्याच्या उद्देशाने आयोजन

▸ सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. २९ : भारतीय राज्यघटनेतील समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुता तसेच मूलभूत हक्क, कर्तव्ये आणि संविधानिक मूल्यांची रुजवणूक करत सुजाण नागरिक घडविण्याच्या उद्देशाने संविधान साक्षरता कार्यशाळेचे आयोजन केले आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनातर्फे ही कार्यशाळा आयोजित केली आहे.

नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे संविधान साक्षरता निवासी कार्यशाळेप्रसंगी सहभागी प्रशिक्षणार्थींसमवेत कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, प्रा. नागार्जुन वाडेकर, नागेश जाधव, ॲड. नीलेश खानविलकर आदी.

कार्यशाळेचे उद्घाटन मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांचे हस्ते झाले. कार्यक्रमाच्या सुरवातीस डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे प्रमुख प्रा. नागार्जुन वाडेकर यांनी केले. त्यांनी अध्यासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध कार्यक्रमांची माहिती उपस्थितांना दिली. कुलगुरू डॉ. सोनवणे म्हणाले, की संविधानाचा प्रचार आणि प्रसार करणारे तुम्ही खरे दूत आहात. या कार्यशाळेचा सर्व सहभागींना निश्चितच उपयोग होईल, असे सांगून त्यांनी कार्यशाळेसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यशाळेस तज्ज्ञ प्रशिक्षक म्हणून नागेश जाधव (मुंबई), ॲड. नीलेश खानविलकर (मुंबई), नीलम पंडित (पुणे), अझरुद्दीन पटेल (सातारा) हे विविध सत्रात प्रशिक्षण देणार आहेत. कार्यशाळेस एकूण चाळीस सहभागींनी सहभाग नोंदवला आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय खरात यांनी केले.



**Book Festival at Kalidas:**









**Yuvak Mahotsav 2023-24:**





